सकाळ | eSakal.com
Published on सकाळ (http://www.esakal.com)

# वास्तव अवयव प्रत्योरापणाचं (सुजाता आयरकर)

- सुजाता आयरकर

रविवार, 14 ऑगस्ट 2016 - 12:45 AM IST

**Share Link:** http://www.esakal.com/Tiny.aspx?K=xAGOMc

विशेष




देशभरात १३ ऑगस्ट हा अवयवदान-दिन म्हणून पाळला जातो. एकीकडं अवयदानाची चळवळ सगळीकडं जोर धरत असताना आणि त्याबाबत सर्वत्र जागृती केली जात असताना किडनी प्रत्यारोपणातला गैरप्रकार मुंबईत नुकताच उघडकीस आला. अवयवदानाच्या चळवळीला धक्का देणाऱ्या या प्रकरणानं वैद्यकीय विश्वालाही हादरा दिला आणि अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. अवयवदान दिनाच्या निमित्तानं यासंबंधीच्या कायद्याचा आणि मुंबईतल्या प्रकरणाचा वेध...

जगभरात १३ ऑगस्ट हा दिवस 'अवयवदान दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचं निमित्त साधून अनेक संस्था व गट रेल्वे स्थानके, सार्वजनिक ठिकाणी विविध कार्यक्रमांचं आयोजन करून, तसेच प्रसारमाध्यमांद्वारे जनतेला अवयवदान करण्यासाठी आवाहन करतात. आता अवयवदान करण्यासाठी इच्छुक असलेल्या लोकांची संख्याही वाढताना दिसत आहे. पण अवयवदान करण्यास इच्छुक असलेल्या या लोकांना मानवी अवयव प्रत्यारोपण कायद्याबाबत किती माहिती आहे? हिरानंदानी रुग्णालयातल्या मूत्रपिंड प्रत्यारोपण प्रकरणातील गैरव्यवहार समोर आल्यानंतर प्रसारमाध्यमांनी या विषयावर लक्ष केंद्रित केलं. या प्रकरणाच्या निमित्तानं अशाच प्रकारच्या काही गैरव्यवहारांना वाचा फुटली आणि या विषयावर ऊहापोह सुरू झाला.

या प्रकरणात आरोपी ठरवल्या गेलेल्या व्यक्तींबद्दल नवनवीन बातम्या दररोज वृत्तपत्रांत वाचायला मिळत आहेत. हिरानंदानी रुग्णालयातील प्रकरणामुळं किडनी रॅकेट चालवणाऱ्या व्यक्ती, किडनी विकत घेणारी व्यक्ती यांच्याप्रमाणेच किडनी देणाऱ्या व्यक्तीलासुद्धा मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा १९९४ दोषी मानतो हे कळलं. या गैरव्यवहारामुळं अनेकांच्या मनात नक्की दोषी कोण असा संभ्रम निर्माण झाला आहे. आपल्या शरीरातला एक महत्त्वाचा अवयव इतक्या सहजपणानं द्यायला माणसं का तयार होतात? त्या व्यक्तीस आपला एक अवयव विकावा लागण्यापर्यंत असं काय घडलं असेल? या साऱ्यामध्ये दोष कुणाचा? त्या व्यक्तीला हे सगळं

बेकायदेशीर असून याचे त्याच्या आरोग्यावर काय दुष्परिणाम होणार आहेत, हे खरोखर सांगितलं जातं का? अवयव प्रत्यारोपण झाल्यानंतर त्या व्यक्तीला खरंच पैसे मिळत असतील का? असे प्रश्न अनेकांच्या मनात घोळायला लागले आहेत.



हिरानंदानी रुग्णालयात किडनी देण्याकरता आलेली महिला जेमतेम दोन ते तीन इयत्ता शिकलेली, एका लहानशा खेड्यात झोपडीवजा घरात राहणारी, मध्यम वयीन स्त्री. घरात नेहमीच पैशांची चणचण असल्यामुळं, तिला नेहमीच उधारी-उसनवारी करावी लागत असे. यामुळं डोक्यावरचं कर्ज दिवसेंदिवस वाढत होतं. गावात आलेल्या एका पाहुण्याकडून तिला पैसे मिळवण्याचा एक नवीन मार्ग कळला. तिची सगळी कर्जे एकत्र फेडता येतील इतके पैसे तिला या कामातून मिळणार होते आणि त्या पाहुण्यानं सांगितल्याप्रमाणं दोन्ही किडन्या खराब झालेल्या एका माणसाचा जीव वाचणार होता. हे पुण्याचं काम आहे व ते केल्यानं तिला चांगले पैसेही मिळणार असल्याचं सांगण्यात आलं होतं. पण ही शस्त्रक्रिया आटोपून ती तिच्या गावी परत आल्यानंतर तिला हे पैसे मिळणार होते. तिनं ही अट कबूल केली व घरी याबद्दल कुणाला काही न सांगता आपण कामाकरता बाहेरगावी जात असल्याचं सांगून मुंबई गाठली. किडनी रॅकेटबद्दल माहिती मिळाल्यानं शस्त्रक्रिया सुरू झालेली असताना पोलिसांनी येऊन ही शस्त्रक्रिया थांबवली. हे प्रकरण चिघळत चालल्याचं लक्षात येताच रुग्णालयानं तिच्यावर उपचार पूर्ण होण्यापूर्वीच व रितसर डिस्चार्ज मिळण्यापूर्वीच पोलिसांच्या ताब्यात दिलं व या प्रकरणातून अंग काढून घेतलं. तिची प्रकृती पूर्णपणे ठीक नसताना, ती रुग्ण असताना शस्त्रक्रियेची ताजी जखम घेऊन रुग्णालय, पोलिस ठाणे, दंडाधिकारी न्यायालय असा प्रवास करत ती शेवटी आरोपी म्हणून तुरुंगात जाऊन पोचली. घरी कुणालाच काही न कळवून आल्यानं तिच्या घरीही सगळे काळजीत होते. अशातच पोलिसांकडून तिच्या कुटुंबाला या घटनेची माहिती देण्यात आली. मुलीनं मुंबईत येऊन आईची भेट घेतल्यानंतर तिला सगळी हकीकत कळली. मुंबईत कुणी नातेवाईक नसल्यानं व पुरेसे पैसे नसल्यानं मुलीला राहण्याची सोय नव्हती व तिला लागलीच गावी परत जावं लागलं.

मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा १९९४ (या कायद्यात २००८, २०११, २०१४ ला दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत) च्या कलम १२ नुसार कुठल्याही नोंदणीकृत डॉक्टरला कुठल्याही व्यक्तीचा मानवी अवयव काढणे किंवा अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्याआधी त्याच्याशी संबंधित सर्व परिणाम, गुंतागुंत व धोके याची पूर्ण

माहिती अवयव देणाऱ्या आणि स्वीकारणाऱ्या व्यक्तीला दिल्याशिवाय अशी शस्त्रक्रिया करण्याची परवानगी नाही. पण कायदा धाब्यावर बसवून सर्रास अशा अनेक शस्त्रक्रिया पार पाडल्या जात असल्याची शक्यता नाकारता येत नाही. जेव्हा कुठल्याही संस्था, गट किंवा आणखी कुणी अवयव दानाकरता लोकांना आवाहन करतात, तेव्हा या सगळ्या गोष्टी सांगितल्या जात नाहीत. अशा प्रकारे अवयव दान करताना दान करणाऱ्या व्यक्तीला सर्व धोके, परिणाम समजावून पूर्ण माहिती देऊन संमती घेणे व त्याकरता सखोल चर्चा आवश्यक आहे.

किडनी देणाऱ्या लोकांमध्ये ग्रामीण भागातल्या लोकांचा अधिक संख्येनं समावेश असतो. इतकी मोठी जोखीम पत्करायला तयार होणाऱ्या लोकांना किती हलाखीच्या परिस्थितीत दिवस काढावे लागले असतील, की ज्यामुळं ते हे काम करायला तयार झालेले असतील. कधी कर्ज फेडण्यासाठी, कधी कुटुंबातील सदस्यांचा आजारपणाचा खर्च भागवण्यासाठी, तर कधी दुसरा कुठलाच पर्याय न उरल्यामुळं. या किडनी देणाऱ्या लोकांना आपण करत असलेलं काम हे बेकायदेशीर असल्याचं बऱ्याचदा माहिती नसतं. अडचणीत सापडलेल्या या लोकांना किडनीच्या बदल्यात मिळणारे पैसे हा सोपा मार्ग वाटत असला तरी याचा त्यांच्या शरीरावर/ आरोग्यावर काय व किती गंभीर परिणाम होऊ शकतो याची त्यांना कल्पना नसते.

अशा अनेक अशिक्षित, गरीब परिस्थितीनं हतबल झालेल्या लोकांची फसगत झाल्याच्या घटना समोर येत आहेत. मुंबईजवळील एका शहरात मुलाला देण्याकरता आईची किडनी काढण्यात आली व नंतर आईची किडनी मुलाच्या किडनीशी जुळत नसल्याचं त्यांना सांगण्यात आलं. या शस्त्रक्रियेत हिरानंदानी प्रकरणात संशयित म्हणून अटक केलेल्या डॉक्टरांपैकी एका डॉक्टरांचा समावेश होता. पुढं त्या आईची किडनी कुणाला दिली, त्याचं काय झालं हे त्या कुटुंबाला ठाऊक नाही.

हिरानंदानी प्रकरणात अटक झालेल्या महिलेला अनेक प्रयत्नांनंतर जामीन मंजूर होऊनसुद्धा तिची सुटका झालेली नाही. कारण जामिनाच्या आदेशात घातलेल्या अटींप्रमाणे जामिनाची रक्कम म्हणून ३० हजार रुपये भरणे, आधीच कर्जबाजारी असलेल्या या कुटुंबाला अशक्य आहे. पैसे न भरू शकल्यास २ जामीन देण्याचा पर्याय आहे. परंतु या जामीन राहणाऱ्या व्यक्तींकडं त्यांची ओळख पटवणारी सर्व आवश्यक कागदपत्रं असणं आवश्यक आहे. तसेच त्यांच्या नावे जामिनाच्या रकमेइतकी संपत्ती असल्याचे पुरावे असायला हवे आहेत. यातील तिसरी अट, महिलेनं आठवड्याच्या प्रत्येक सोमवारी पोलिस ठाण्यात हजेरी लावणं आवश्यक आहे. पण या महिलेस प्रत्येक सोमवारी मुंबईला येण्याचा खर्च करणं शक्य नाही. कुटुंबाला हलाखीच्या परिस्थितीतून बाहेर काढू पाहणाऱ्या या महिलेला सध्या आगीतून फुफाट्यात पडल्यासारखं वाटत असल्यास नवल नाही.

या कायद्यामुळं अनेकांचे धाबे दणाणले आहेत. संशयित असल्याच्या शक्यतेमुळं हिरानंदानी रुग्णालयाच्या डॉक्टरांना अटक झाल्यानंतर अनेक डॉक्टरांनी राज्य शासनाच्या आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांची भेट

घेण्याचं ठरवलं आहे. त्यांनी या प्रकरणाचा संदर्भ देऊन अवयव प्रत्यारोपण प्रकरणात अवयव देणारी आणि घेणारी व्यक्ती यांच्यातल्या नातेसंबंधांची वैधता तपासण्याकरता डॉक्टरांना जबाबदार धरू नये, असं म्हटलं आहे. कागदपत्रे तपासणीत डॉक्टरांची भूमिका स्पष्ट केल्याशिवाय कुठलीही प्रत्यारोपण शस्त्रक्रिया न करण्याची भूमिका घेतली आहे. समाजातल्या सुशिक्षित व जाणकार वर्गापैकी असणाऱ्या डॉक्टरांच्या समूहानं अशा वेळेस त्यांची नैतिक जबाबदारी म्हणून या अटक झालेल्या डॉक्टरांना प्रश्न विचारण्याऐवजी शस्त्रक्रिया न करण्याची भूमिका घेऊन गरजू रुग्णांना वेठीस धरून संशयित डॉक्टरांना मदत होईल असा पवित्रा घेणं चुकीचं असल्याची अनेकांची भावना आहे.

भारतात सार्वजनिक आरोग्य सुविधेचं क्षेत्र २० टक्के असून, खासगी आरोग्य सुविधेचं क्षेत्र ८० टक्के आहे. सार्वजनिक आरोग्य सुविधेच्या चौपट असलेलं हे खासगी आरोग्य सुविधेचं क्षेत्र अनियंत्रित असून, त्यावर सरकाराचं कुठल्याही प्रकारचं नियंत्रण नाही. आधीच भरमसाट फी आकारणी, अनावश्यक चाचण्या, शस्त्रक्रिया व अनैतिक पद्धतीचा अवलंब असे अनेक प्रश्न खासगी आरोग्य सुविधेचा लाभ घेणाऱ्या रुग्णांना भेडसावत आहेत. अशा परिस्थितीत या एवढ्या मोठ्या खासगी आरोग्य सुविधा व्यवस्थेचा एक लहानसा भाग जर या कायद्यामुळं नियंत्रित केला जात असेल तर डॉक्टरांना इतका त्रास होण्याचे काय कारण आहे? मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा १९९४ अंतर्गत नोंदणीकृत रुग्णालयातच या शस्त्रक्रिया केल्या जाऊ शकतात. तसेच जर अवयव देणारी व घेणारी व्यक्ती जवळचे नातेवाईक नसतील तर प्रत्यारोपण प्राधिकरण समितीची परवानगी घेणे आवश्यक आहे. या समितीकडून सत्यता पडताळणी केली जाते. (महाराष्ट्र शासन निर्णय एप्रिल २०१४). या समितीला कळवणं हा रुग्णालयाच्या नियम व जबाबदारीचाही भाग आहे. अवयव प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रिया या खासगी रुग्णालयांप्रमाणेच शासकीय/ सार्वजनिक आरोग्य सुविधा पुरवणाऱ्या रुग्णालयांतही होत आहेत. पण सार्वजनिक आरोग्य सुविधा पुरवणारी रुग्णालये कायद्याचे पालन करून शस्त्रक्रिया करत असून, तिथं असे गैरप्रकार झाल्याचं आढळून येत नाही.

एकीकडे संशयित म्हणून अटक झालेल्या डॉक्टरांना इतर डॉक्टरांकडून पाठिंबा मिळतोय, त्यांच्याकडे या प्रकरणातून लवकरात लवकर बाहेर पडण्याकरता आवश्यक सर्व संसाधने आहेत. त्यांना काही दिवसांत जामीन मिळून ते सुटतीलही कदाचित. दुसरीकडे ही महिला जी जामिनाचे आदेश मिळूनही पुरेशा संसाधनांअभावी अजूनही तुरुंगात आहे.

या साऱ्यातून अखेर हाच प्रश्न उपस्थित होतो, की डॉक्टर व रुग्णालयांवर नियंत्रण राहावं याकरता या कायद्याद्वारे बंधनं घातलेली असूनही इतके गैरप्रकार होत असतील तर कुठल्या आधारावर ही बंधनं शिथिल करण्याची मागणी केली जात आहे? अजूनही तुरुंगात असलेली महिला खरी पीडित, की गैरप्रकार उघडकीला आल्यानंतर कायद्याची बंधनं जाचक वाटत असून ती शिथिल करण्याचा हट्ट धरणारे डॉक्टर पीडित?